महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४१ वा दिनांक : ३१/१०/२०२४ वार : गुरूवार

## मला मुख्यमंत्री पदाची कोणीतीही लालसा नाही : देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर ते मुख्यमंत्रीपदासाठी आसुसलेले असल्याची नेहमीच टीका केली जाते. पण आता खुद्द फडणवीस यांनीच आपल्याला आता या पदाची कोणतीही लालसा राहिली नसल्याचे स्पष्ट केले आहे. सद्यस्थितीत माझ्या मनात मुख्यमंत्री होण्याचे कोणतेही स्वप्न किंवा लालसा उरली नाही. पक्ष देईल ती जबाबदारी मी नेटाने सांभाळेन, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानाची राज्याच्या राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी एका मराठी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना उपरोक्त विधान केले. ते म्हणाले, मी सलग ५ वर्षे राज्याचा मुख्यमंत्री होतो. महाराष्ट्रात आतापर्यंत केवळ २ मुख्यमंत्र्यांनाच ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला. त्यापैकी एक वसंतराव नाईक व दुसरा मी. त्यामुळे आता माझ्या मनात मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न किंवा लालसा काहीही उरले नाही. आता मला जी जबाबदारी दिली जाईल, ती मी पूर्ण करेन. महायुती ज्याच्या नावाची मुख्यमंत्री म्हणून घोषणा करेन, त्याच्या पाठिशी मी ठामपणे उभा राहीन.

## भाजपने अजित पवार, एकनाथ शिंदेंचा पक्ष संपवला : रमेश चेन्नीथला



**मुंबई :** मविआमध्ये कुठेही मैत्रीपूर्ण लढत नाही, कुणी जर अर्ज दाखल केले असतील तर मागे घ्यावे असे आवाहन काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथला यांनी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना केले आहे. मविआमध्ये सर्व पक्ष एकत्र निवडणूक लढवत आहेत. तर दुसरीकडे महायुतीमध्ये केवळ भाजप निवडणूक लढत आहे, शिंदेगटातून भाजपचे उमेदवार लढताय, अजित पवारांच्या पक्षातून भाजपचे लोकं लढत आहे, हे सगळं त्यांचे पक्ष संपवण्यासाठी सुरू आहे. रमेश चेन्निथला पुढे बोलताना म्हणाले की, महायुती संपली आहे तिचे काही अस्तित्व उरले नाही, महायुतीमध्ये केवळ भाजप निवडणूक लढवत आहे. शिंदेगट आणि अजित पवार यांच्या पक्षातून केवळ भाजपचे उमेदवार निवडणूक लढवत आहे असा टोला त्यांनी यावेळी बोलताना लगावला आहे. रमेश चेन्निथला म्हणाले की, शिंदे आणि अजित पवार यांना या निवडणुकीतून संपवले आहे. आम्ही सर्व पक्षांना सोबत घेऊन मविआमध्ये काम करत आहे. १८० ते २०० जागांवर भाजप लढत आहे, त्यांच्या स्पष्ट संदेश द्यायचा आहे की महायुतीमधील पक्षांना संपवायचे, काँग्रेसच्या कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी ab फॉर्म दिलेला आहे त्यांचाच प्रचार करावा. समाजवादी पक्ष आणि आमच्या आघाडी बददल चर्चा सुरु आहे ४ तारखे आधी त्यावर निर्णय होईल , हे सरकार बिनकामाचे आहे त्यामुळे यंदा मविआचे सरकार हेच आमचे ध्येय आहे . लाडकी बहीण योजना बंद केली कारण त्यांच्याकडे पैसा नाही म्हणून त्यांनी निवडणूक आयोगाला पुढे करत ही योजना बंद केली , केवळ निवडणुकीसाठी ही योजना होती असा आरोप त्यांनी केला आहे.

## राज्यपालांनी अजित पवार व देवेंद्र फडणवीसांवर गुन्हा नोंदवावा : राऊत



**मुंबई :** आर. आर. पाटील यांचे केस फार लहान होते, ते केसाने गळाने कापू शकत नाहीत. अत्यंत प्रामाणिक आणि कर्तबगार असे या राज्याचे ते गृहमंत्री होते. त्यामुळे त्यांनी कधी गृहमंत्री म्हणून चुकीचे काम केले असे आम्हाला वाटत नाही, असे म्हणत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अजित पवारांना टोला लगावला आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की,अजित पवार यांनी काल आर. आर. पाटील यांनी सिंचन घोटाळ्यावर सही केल्याचे जनतेला दाखवले. तसेच फडणवीस यांनी मला सही केल्याचे दाखवले, असेही त्यांनी म्हटले. त्यामुळे आता अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर गुन्हा दाखल व्हायला पाहिजे. कारण त्या दोघांनी संविधानानुसार गोपनीयतेची शपथ घेतली आहे. शपथ घेतल्यानंतर अशी माहिती सार्वजनिक करणे हा गोपनीयतेचा भंग आहे आणि फार मोठा गुन्हा आहे. त्यामुळे राज्यपालांनी या दोघांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले पाहिजेत.

संजय राऊत यांनी मविआतील बंडखोरीवर देखील भाष्य केले आहे. ते म्हणाले की, ९० टक्के नाराजांची समजूत काढण्यात आम्ही यशस्वी झालो आहे. निवडणुकीत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. त्याआधी एकत्र बसू आणि आमच्या प्रत्येक घटक पक्षाच्या उमेदवाराने अर्ज भरलाय त्याची समजूत काढू. मविआला निवडणूका जिंकायच्या आहेत. त्यामुळे दोन-चार जागा मित्र पक्षाने जास्त लढल्या आणि जिंकल्या, तर इतर घटक पक्षांना वाईट वाटण्याचं कारण नाही.जिथे ज्या पक्षाची ताकद जास्त जास्त आहे, त्या ठिकाणी तो पक्ष जास्त जागा लढवेल. विदर्भात काँग्रेसला वेगळ स्थान आहे त्यामुळे तेथे त्यांच्या जास्त जागा दिसत आहेत. आम्हाला या राज्यात बदल घडवायचा आहे आणि बदल घडवण्यासाठी सर्वांनी एकत्र राहणं गरजेच आहे. प्रत्येकाला उमेदवारीची इच्छा असते. २८८ जागा अलायन्समध्ये कोणालाच लढता येत नाही.

संजय राऊत म्हणाले की, मिरजेची जागा शिवसेनेला सुटली. तानाजी सातपुते यांनी अर्ज भरला आहे. भाजपातून आलेल्या उमेदवाराला काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली, मग कसला सांगली पॅटर्न? हे समजून घेतले पाहिजे. सांगलीत काँग्रेसमध्ये सुद्धा बंडखोऱ्या झाल्या आहेत. प्रत्यक्ष सांगलीत पृथ्वीराज पाटील आणि जयश्री पाटील एकमेकाच्या विरुद्ध उभे आहेत. मग सांगली पॅटर्न कोणाचा?. पृथ्वीराज पाटील अधिकृत उमेदवार आहेत. विशाल पाटील यांच्या वहिनी जयश्री पाटील यांनी बंडखोरी केली आहे.

## माझ्यासारख्या कार्यकर्त्यांवर अन्याय करू नका : सदा सरवणकर



**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी चिरंजीव अमित ठाकरे यांना माहीममधून मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. अमित ठाकरे यांच्यासाठी विद्यमान आमदार सदा सरवणकर यांनी माघार घ्यावी, अशी मागणी मनसेकडून होत आहे. मात्र, सदा सरवणकर यांनी माघार घेण्यास नकार दिला असून उमेदवारी अर्ज देखील भरला आहे. दरम्यान, राज ठाकरे यांनी मला समर्थन द्यावे, अशी विनंती सदा सरवणकर यांनी केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत राज ठाकरे यांच्याकडे विनंती केली आहे.

सदा सरवणकर आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हणाले की, मी चाळीस वर्षापासून शिवसेनेचा कार्यकर्ता आहे. आम्ही आमच्या कष्टाने आणि घामाने तीन वेळा माहिमचा आमदार झालो. बाळासाहेब असते तर त्यांनी मला आपल्या नातेवाईकांसाठी सीट सोडायला सांगितले नसते. त्यांचे पन्नास नातेवाईक दादर - माहिम मध्ये राहतात पण उमेदवारी त्यांनी माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला दिली. ते कार्यकर्त्यांची भावना जपणारे नेते होते. एकनाथ शिंदे साहेबांकडे पाहा त्यांचे सुपुत्र हे तीन वेळचे खासदार असताना सुद्धा त्यांनी आपल्या मुलाला केंद्रात मंत्री बनवले नाही, तर एका निष्ठावंत शिवसैनिकाला ती संधी दिली. राजसाहेबांना मी विनंती करतो माझ्यासारख्या कार्यकर्त्यांवर अन्याय करू नका. मला आपले समर्थन द्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३१ ऑक्टोबर २०२४


# पंतप्रधान मोदी, अमित शाह महाराष्ट्रात तळ ठोकणार



**मुंबई** : राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यावी प्रक्रिया मंगळवारी पूर्ण झाली. आता सर्वच राजकीय पक्षांनी प्रचारावर लक्ष केंद्रीत केले आहे. भाजपच्या वतीने विधानसभा निवडणूक प्रचाराचा मेगा प्लॅन तयार केला आहे. भाजपच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह बडे नेते प्रचाराच्या रणधुमाळीत उतरणार आहेत. मोदी यांच्याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील अनेक जाहीर सभांना संबोधित करणार आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या सुत्रांनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबई-कोंकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रात एकूण ८ सभा घेणार आहेत. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि भापजचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही जास्तीत जास्त सभा घेण्याची जबाबदारी असणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भाजपकडून विधासनभा निवडणुकीच्या प्रचारासाठी १०० हून अधिक सभांचे नियोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी एकूण ८ प्रचार सभा घेणार असून गृहमंत्री अमित शाह २० सभांना संबोधित करणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या ४० सभा होणार आहेत. तर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सर्वाधिक ५० प्रचार सभा घेणार आहेत. भाजप प्रदेशाध्यक्ष ४० तर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ १५ सभांना संबोधित करणार आहेत. दरम्यान, या सभा राज्यातील महत्त्वाच्या मतदारसंघांत होणार आहेत. या सभांची तारीख अद्याप समोर आलेली नाही. मात्र, दिवाळीनंतर भाजपकडून प्रचाराचा नारळ फोडला जाणार असल्याची चर्चा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ७ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर महाराष्ट्रात तळ ठोकून असणार आहेत. या ८ दिवसांत ते विविध मतदारसंघात जाहीर सभा घेतील. पंतप्रधान मोदी १४ नोव्हेंबरपासून परदेश दौऱ्यावर जाणार आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे प्रचारासाठी फारसा वेळ नसणार. त्यामुळे या ८ दिवसांत मोदींच्या जास्तीत जास्त सभा घेण्यावर महायुती भर देईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ भाजपच नाही तर महायुतीच्या घटक पक्षातील उमेदवारांच्या प्रचारासाठी सुद्धा सभा घेणार आहेत.

विधानसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी १८ नोव्हेंबर पर्यंत वेळ दिल आहे. त्यामुळे राज्यभरात मोठमोठ्या नेत्यांच्या जाहीर सभांचा धडाका राहणार आहे. विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा थेट सामना होणार आहे. दोघांकडूनही मोर्चेबांधणी करण्यात येत असून स्टार प्रचारकांच्या सभांकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदार होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे.

# २०२४ मध्ये भाजपचा, २०२९ ला मनसेचा मुख्यमंत्री : राज ठाकरे



**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या विधानाने मतमोजणी पूर्ण होण्याआधीच एकाप्रकारे निवडणुकीचा निकाल जाहीर केला आहे. २०२४ मध्ये भाजपचा मुख्यमंत्री होणार असून हा आपला अंदाज असल्याचे ही त्यांनी म्हटले आहे. २०२४ मध्ये मुख्यमंत्री भाजपचाच होईल, तर २०२९ मध्ये मुख्यमंत्री हा मनसेचा असेल, असा दावाही राज ठाकरे यांनी व्यक्त केले. त्यांच्या या विधानामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या असून राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आगामी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत त्यांनी १०० हून अधिक उमेदवारांची घोषणा केली आहे. राज ठाकरे यांनी चिरंजीव अमित ठाकरे यांना माहीममधून विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. दरम्यान, काही मतदारसंघांमध्ये मनसे आणि महायुतीची मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याची चर्चा आहे.

यंदाची निवडणूक रंजक होणार असून सर्वांना निकालाची उत्सुकता आहे. त्यातच, राज ठाकरे यांनी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना २०२४ चा मुख्यमंत्री हा भाजपचाच होईल, तर २०२९ चा मुख्यमंत्री मनसेचा असेल, असे भाकीत केले. यामुळे राज ठाकरेंनी एकप्रकारे देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळण्याची शक्यता असल्याचे सूचक विधान केले आहे. तसेच, मनसेच्या पाठिंब्यावरच हा भाजपचा मुख्यमंत्री होईल, असेही राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरे यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे यांच्याविरोधात वरळीमध्ये मनसेचा उमेदवार उभा केला नव्हता. मात्र, २०२४ निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी माहीम मतदारसंघात पुतण्या अमित ठाकरे विराधोत उमेदवार दिला आहे. यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले. आदित्य ठाकरेंसाठी मी विचार केला. विरोधातील पक्ष असला तरी मी राजकारण आणि नातेसंबंध जपत असतो. राजकारणाशी कौटुंबिक संबंध ठेवण्याची प्रेरणा बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून मिळाली.

आदित्य ठाकरे निवडणूक लढतोय, म्हणून आपण उमेदवार नको देऊया, असे मला वाटले. मला त्याचा पश्चाताप नाही. समोरचा तसा विचार करेलच अशी अपेक्षा नाही. प्रत्येकजण आपल्या स्वभावानुसार वागत असतो. भाजपला ही गोष्ट कळू शकते, सगळ्यांनाच हे कळेल असे नाही. प्रत्येकाचे ओरबाडण्याचे प्रयत्न सुरु असतात, असे म्हणत राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

# शिवसेना पक्ष फोडायला सैनिकी ऑपरेशनसारखे केले : पृथ्वीराज चव्हाण यांचा भाजपवर आरोप



**सातारा** : येथील पत्रकार परिषदेत बोलताना माजी मुख्यमंत्री व कॉंग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. शिवसेना पक्ष फोडायला राजमान्यता होती. शिवसेना पक्ष फोडण्यासाठी सर्व यंत्रणा त्याच्या दीमतीला लावली होती. सैनिकी ऑपरेशन सारखे हे ऑपरेशन राबवण्यात आले, असा आरोप पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, सैनिकी ऑपरेशन सारखे ऑपरेशन शिवसेना पक्ष फोडण्यासाठी राबवण्यात आले होते.

त्यामुळे भ्रष्टाचार मुक्त सरकार देणार म्हणणाऱ्या मोदींचे न खाऊंगा ना खाने दुंगा हे वाक्य किती हास्यास्पद होते हे यावरून स्पष्ट होते. एकीकडे महिलांना १५०० रुपये देऊन खुश करून मते मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे जया थोरात यांच्या विषयी बड्या नेत्यांनी चुकीची वक्तव्य करायची आणि त्याची माफी देखील मागितली नाही. यावरून भाजपची मानसिकता समजते.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, माझ्यावर आरोप होता की मी एफआयआर केला. मी चौकशी लावली. मात्र हे खरे नाही मी फक्त याची श्वेतपत्रिका काढायला लावली होती. मी मुख्यमंत्री असताना घोटाळा हा शब्द देखील याबाबत वापरला नव्हता. अँटी करप्शन कडून या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे अशी शिफारस खालून आली. त्याला गृहमंत्र्यांनी मान्यता दिली. मात्र अद्याप ची फाईल मी पाहिलेली नाही. मात्र याची शिक्षा मला भोगावे लागली. माझे सरकार पाडले गेले. माझा कोणताही भाग नसताना हे सगळे मला भोगावे लागले. सिंचन घोटाळ्याबाबत भोपाळमध्ये भाषणात मोदींनी भ्रष्टाचार झाल्याचे स्वतः सांगितले आहे. त्यामुळे यात वेगळा पुरावा द्यायची गरज नाही, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३१ ऑक्टोबर २०२४

# विधानसभेला आरक्षण बचाव महत्वाचा मुद्दा : प्रकाश आंबेडकर



**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीत ‘संविधान बचाव’ नाही, तर ‘आरक्षण बचाव’ हा महत्त्वाचा मुद्दा असणार आहे, असे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीत दलित आणि मुस्लिम मतदार इंडिया आघाडीकडे वळले होते. विधानसभा निवडणुकीत या दोन्ही समुदायांची मते वंचितकडे पुन्हा येतील, असा दावाही त्यांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत केला. यावेळी त्यांनी आपला जुना सहकारी पक्ष एमआयमएमवरही टीका केली. एमआयएम प्रामाणिक पक्ष नसल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

गत लोकसभा निवडणुकीत वंचित आणि एमआयएमची युती होती. मात्र, विधानसभेला कोणत्याही आघाडीत सहभागी न होण्याचा निणर्यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, २०१९ पर्यंत आमच्याबरोबर अनेक ओबीसी संघटना होत्या. एमआयएम हा प्रामाणिक पक्ष नव्हता; त्यांनी पळ काढला. आमचे मुस्लिम बांधवाशी थेट संबंध आहेत. त्यामुळे अल्पसंख्याकांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्हाला इतर पक्षांची गरज नाही. आम्ही विधानसभा निवडणुकीसाठी २० मुस्लिम उमेदवारांना तिकीट दिले आहे. मागच्या ७० वर्षांत मुस्लिमांना पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले असल्याचे आंबेडकर म्हणाले.

महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या कुणाचे पारडे जड आहे या प्रश्नावर उत्तर देताना आंबेडकर म्हणाले, महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्ष धोरण ठरवित नाहीत. त्यामुळे यंदाची निवडणूक मनोज जरांगे पाटील आणि वंचित बहुजन आघाडीमध्ये होणार आहे. . जरांगे पाटील यांनी ओबीसी प्रवर्गातून मराठा आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन सुरू केले आहे. तर, ओबीसींकडून याला विरोध केला जात आहे. त्यामुळे दोन गट तयार झाले आहेत. मराठा हे ओबीसीला मतदान करणार नसल्याचे सांगतात. तर ओबीसी मराठा उमेदवारांना मतदान करणार नाहीत. जरांगे पाटील हे उमेदवार उभे करणार असल्यामुळे राष्ट्रीय पक्षांना फटका नक्कीच बसेल, असे ते म्हणाले.

प्रकाश आंबेडकर यांनी मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याबाबत आपले मत व्यक्त केले. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात जागा देऊ नये, याला आमची प्राथमिकता असेल. तसेच सवर्ण समाजकडून ‘मेक इन इंडिया’चा नारा दिला जातो; पण आम्ही ‘बहुजन मेड इन इंडिया’बाबत आग्रही आहोत. बहुजनांमध्ये अनेक कौशल्य कारागीर आहेत. भारतात कशा प्रकारे उत्पादन वाढवायचे, याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. त्यामुळे आम्ही भविष्यात रोजगारनिर्मितीच्या अनुषंगाने पावले टाकू, असे आंबडेकर यांनी सांगितले.

केंद्रात भाजप बहुमताने आल्यास आरक्षण संपुष्टात येईल, या भीतीने वंचितचे मतदार काँग्रेसकडे वळाले, असे तुम्हाला वाटत नाही का? यावर उत्तर देताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, लोकसभा निवडणुकीला मुस्लिम आणि दलित मतदार महाविकास आघाडीला मतदान केले होते. मागच्या लोकसभा निवडणुकीत मुस्लीम पूर्णपणे इंडिया आघाडीकडे वळले. ८० टक्के दलितांनीही आघाडीला मतदान केले. लोकसभा निवडणुकीवेळी संविधान बचावासाठी मतदारांनी महत्त्व दिले. यावेळी आरक्षण वाचविण्यासाठी मतदान करतील. सवर्ण पक्ष आणि काँग्रेस, भाजपा हे आरक्षणविरोधी पक्ष आहेत. त्यामुळे मुस्लिम आणि दलित मतदार पुन्हा आमच्याकडे वळतील, असा विश्वास प्रकाश आंबेडकरांनी व्यक्त केला.

प्रकाश आंबेडकरांनी राहुल गांधी यांच्या जातीय जनगणनेच्या मागणीवर भाष्य केले. राहुल गांधी हे दुटप्पी आहेत. राहुल गांधी बोलतात एक आणि त्यांचा पक्ष करतो दुसरेच. सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला मान्यता दिल्यानंतर तेलंगणा आणि कर्नाटकने त्यासाठी समिती गठित केली. मात्र, दलित संघटनांचे यावर वेगळे मत असल्याचे ते म्हणाले.

# मी पवारांनी केलेली नक्कल पाहिली नाही - अजित पवार




**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मंगळवारी एका सभेत अजित पवार यांची नक्कल केली होती. त्याचा आता अजित पवार यांनी खरपूस शब्दांत समाचार घेतला आहे. शरद पवारांना नक्कल करण्याचा अधिकार आहे. पण ते एक देशातील मोठे नेते आहेत. त्यांनी त्यांच्या मुलासारख्या असणाऱ्या व्यक्तीची नक्कल करणे अनेकांना आवडले नाही, असे ते म्हणालेत.

शरद पवार यांची मंगळवारी बारामती विधानसभा मतदारसंघातील कन्हेरी येथे एक सभा झाली. या सभेत शरद पवार यांनी अजित पवार यांच्या कथित रडगाण्याची नक्कल केली. त्यांच्या या नक्कलेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. अजित पवार यांनी बुधवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना या प्रकरणावर भाष्य केले.

अजित पवार म्हणाले, शरद पवारांनी केलेली नक्कल मी पाहिली नाही. पण ती माझ्या कानावर आली. नक्कल करणे हा त्यांचा अधिकार आहे. मी त्यावर बोलणार नाही. पण शरद पवार हे राज्य व देशाच्या राजकारणात ज्या उंचीवर आहेत, ते पाहता त्यांनी त्यांच्या मुलासारख्या असलेल्या माणसाची नक्कल करणे अनेकांना आवडले नाही. त्यांच्या जागी इतर एखाद्या व्यक्तीने असे केले असते तर चालले असते.

बारामती येथील सभेत मी भावनिक झालो, पण मी रुमाल काढला नाही. याऊलट त्यांनी रुमाल काढला. माझ्या आई-वडिलांचे नाव घेतल्यामुळे मी भावनिक झालो होतो. मी लगेच पाणी पिले आणि विषय बदलला. प्रत्येकाला भावना असतात. मन असते. प्रत्येकवेळी माणूस कठोर राहू शकत नाही. जे झाले ते पूर्णतः नैसर्गिक होते. एवढ्या दिवसापर्यंत मला वाटत होते की, केवळ राज ठाकरे हेच नक्कल करतात. पण आता दुसरेच समोर आले. हे पाहून माझ्या मनाला वेदना झाल्या. शरद पवारांना मी दैवत मानले होते.

आम्ही एकाच कुटुंबातील सदस्य आहोत. आम्ही त्यांच्यापुढेच लहानाचे मोठे झालो. त्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी आम्ही केल्या. पण त्यानंतरही त्यांनी आमची नक्कल करावी हे बरोबर नाही, असेही अजित पवार यावेळी बोलताना म्हणाले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३१ ऑक्टोबर २०२४


# भाजपचा विरोध डावलून नवाब मलिकांना उमेदवारी



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने वादग्रस्त नवाब मलिक यांना मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. भाजप व सत्ताधारी शिवसेनेने मलिक यांच्या उमेदवारीवर तीव्र आक्षेप घेतला होता. पण अजित पवारांनी या दोन्ही पक्षांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करत अखेरच्या क्षणी नवाब मलिक यांना पक्षाचा एबी फॉर्म दिला. आता यावर अजित पवारांनी स्पष्टीकरण दिले आहे. नवाब मलिक यांच्यावर झालेल्या आरोपांत कोणतेही तथ्य नाही असे मला वाटते. त्यामुळे आम्ही त्यांना पक्षाची उमेदवारी दिली, असे ते म्हणालेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे वादग्रस्त नेते नवाब मलिक यांच्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मनी लाँड्रिंग व कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम सोबत संबंध असल्याचा गंभीर आरोप केला होता. यामुळे भाजप व शिवसेनेने त्यांना सोबत घेण्यास कडाडून विरोध दर्शवला होता. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस त्यांना उमेदवारी देणार किंवा नाही याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले होते.

पण अजित पवारांच्या राष्ट्रवादीने प्रथम नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक यांना अणूशक्तीनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. त्यानंतर खुद्द नवाब मलिक यांनाही मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून मैदानात उतरवले. त्यांच्या या भूमिकेवरून महायुतीत वाद निर्माण झाला असताना आता स्वतः अजित पवार यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना यासंबंधीची आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

अजित पवार म्हणाले, नवाब मलिक यांच्यावर काही आरोप झालेत. पण ते सिद्ध झाले नाहीत. माझ्यावरही अनेक आरोप झालेत. एखादा व्यक्ती पुढे जात असेल, तर त्याच्या शक्तीस्थळावर आघात करण्यासाठी आरोप केले जातात. राजीव गांधी यांची मिस्टर क्लीन अशी इमेज होती. ती डॅमेज केल्याशिवाय त्यांची ताकद कमी करता येणार नाही हे विरोधकांना माहिती होते. त्यामुळे त्यांच्यावर बोफोर्सचे आरोप झाले.

यामुळे इंदिरा गांधी यांच्यापेक्षा जास्त जागा निवडून आणलेल्या नेत्याला जबर फटका बसला. यामुळे आरोप असणे वेगळे, एखादा आरोप सिद्ध होणे वेगळे. या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. नवाब मलिक यांच्यावर केवळ आरोप झाला आहे. पण त्यात कोणतेही तथ्य नसल्याचे आमचे म्हणणे आहे.

अजित पवार यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने केवळ ५५ जागा का घेतल्या? यावरही आपली भूमिका स्पष्ट केली. आम्ही महायुतीत सर्वात कमी जागा का घेतल्या हे तुम्हाला उमेदवारी अर्ज मागे घेतले जातील तेव्हा कळेल. आम्हाला अधाशासारख्या जास्त जागा घेऊन शून्य जागा निवडून आणायच्या नाहीत. आवाक्यात असणाऱ्या जागा घेऊन त्या निवडून आणण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान, महायुती व महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला अद्याप जाहीर झाला नाही. पण उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशीच्या चित्रानुसार महायुतीत भाजप सर्वाधिक १४८ जागांवर लढत असून, एकनाथ शिंदेंची शिवसेना ८०, तर अजित पवारांची राष्ट्रवादी केवळ ५३ जागांवर लढत आहे. महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे १०२, उद्धव ठाकरेंचे ८९ व शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे ८७ उमेदवार मैदानात आहेत.

# सामाजिक शास्त्रांमुळेच सामाजिक प्रश्नांची उकल होते - डॉ. संग्राम मोरे



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** सामाजिक शास्त्र हे मानवाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारी शास्त्र आहेत, समाजात जीवन जगताना निर्माण होणारे प्रश्न सुटल्याशिवाय आदर्श जीवन जगता येणार नाही, जीवनात निर्माण होणाऱ्या प्रश्नाची उकल झाल्याशिवाय पुढे जाता येणार नाही, या सर्व प्रश्नांची उकल करून जगण्याचा मार्ग दाखवण्याचे काम सामाजिक शास्त्रच करू शकतात असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संग्राम मोरे यांनी केले. ते श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र मंडळाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते.शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्घाटन काल दिनांक 24 ऑक्टोबर रोजी संपन्न झाले. याप्रसंगी पुढे बोलताना डॉ. संग्राम मोरे यांनी म्हटले की जीवनात निर्माण होणारे प्रश्न सोडवताना विद्यार्थ्यांनी सामाजिक शास्त्र मंडळाच्या माध्यमातून कार्य करावे, या मंडळाने सामाजिक समस्यांचा अभ्यास करावा आणि समाजाला योग्य मार्ग दाखवण्याचे काम करावे. अशी सामाजिक शास्त्रेच माणसात समाज भान निर्माण करतात असे प्रतिपादन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सामाजिक शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतः मध्ये कौशल्ये विकसित करावी. महाविद्यालयातील उपलब्ध सर्व सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. वसंत हि:सल, डॉ. डी. बी. ढोबळे, डॉ. धनराज इटले, सामाजिक शास्त्र मंडळाचे अध्यक्ष कु. महादेवी सास्तुरे, मंडालील सर्व पदाधिकारी, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद मंमाळे यांनी केले तर प्रज्वल चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वेदिका रामनाथ टेकाळेचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे प्रवेश



**कन्नड (प्रा. डॉ. प्रकाश खेत्री) :** सावित्रीबाई फुले कन्या उच्च माध्यमिक विद्यालयातील , इतिहास विभागातील प्रा . रामनाथ टेकाळे सर यांची कन्या कुमारी वेदिका रामनाथ टेकाळे यांनी नीट परीक्षेत ६१८ मार्क्स प्राप्त केले. पहिल्या राऊंडमध्ये अण्णासाहेब चुडामण पाटील वैद्यकीय महाविद्यालय,धुळे येथे नंबर लागला.

तिसऱ्या राऊंडमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली येथे नंबर लागला आहे. कु. वेदिकाचे प्राथमिक शिक्षण फातिमा कॉन्व्हेंट स्कूल येथे पाचवीपर्यंत झाले तर सहावी ते दहावी नवोदय विद्यालय , कन्नड येथे शिक्षण झाले.

ती नवोदय विद्यालयातील ती दहावी मध्ये जिल्ह्यातून सर्वप्रथम आली , स्कॉलर विद्यार्थीनी आहे . तुझे अकरावी व बारावीचे शिक्षण जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ पिंपरखेडा येथे झाले . बारावी विज्ञान शाखेत तिने ९०% गुण संपादित केले होते.

आई प्रमिला या शिक्षक व वडील प्राध्यापक आहेत. बालपणापासून तिला वाचनाची आणि लेखनाची आवड आहे. ती किमान नीटचा रोज १२ ते १४ तास अभ्यास करत असे. नीट च्या पहिल्याच प्रयत्नामध्ये तिने हे घवघवीत यश प्राप्त केले आहे. या

यशामध्ये तिची आई प्रमिला वडील प्रा. रामनाथ टेकाळे, शिक्षक गणेश जाधव, प्राचार्य संजय जाधव, प्रा. गणेश विसपुते , प्रा. महेंद्र बाविस्कर, प्रा. संतोष रिंढे प्रा. विजय भोसले, डॉ. भास्कर टेकाळे, डॉ. प्रकाश खेत्री, शिक्षक लक्ष्मण चादर, प्रा. जीवन भुसारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे .


